संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक माणदेशी बुलंद आवाज..

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे

मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com

● वर्ष : ७ वे ● ● अंक : ४६ वा ● ● शुक्रवार दि. ११ ऑगस्ट २०२३ ● ● किंमत २ रू ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021 Postl Reg : SGL/143/2023-2025



एम एन जाधव (सर) हॉस्पिटल यांचे

श्राव्या डायग्नोस्टिक्स

डिजिटल एक्स-रे सोनोग्राफी सेंटर,आटपाडी

डॉ.सौ. चैताली सप्तेश जाधव (M.B.B.S. D.M.R.E.)

डॉ. सप्तेश मधुकर जाधव (M.B.B.S.M.S. D.N.B. F.M..S.)

उपलब्ध सुविधा

* सर्व प्रकारचे डिजिटल एक्स-रे * गरोदर मातांची सोनोग्राफी 4 D स्कॅन व गर्भातील बाळांचे व्यंग निदान करणे * पोटाची, छातीची, थायराईड व स्तनाची अत्याधुनिक (हाय रिझोल्यूशन) स्कॅन * वंधत्वसाठीची आणि पाळीच्या समस्या बाबतच्या सोनोग्राफी * इंटरव्हेशनल सोनोग्राफी * सोनोग्राफीद्वारे गाठीचा तुकडा तपासणे, छातीतील किंवा पोटातील पाणी. पु काढणे. तसेच लिव्हर मधील गाठीचा (Abcess) सोनोग्राफीद्वारे उपचार

पत्ता : ग्रामीण रुग्णालयासमोर, आटपाडी

## मोदी सरकारविरोधातला अविश्वास प्रस्ताव फेटाळला

### काँग्रेसच्या चौधरींचे निलंबन ! इंडिया आघाडी नसून घमंडिया आघाडी : मोदी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नवी दिल्ली :** केंद्रातील भाजप सरकारविरोधात अविश्वास ठराव मांडण्यात आला. त्यावर गेल्या दोन दिवसांपासून लोकसभेत चर्चा सुरू आहे. मोदी सरकारविरोधात विरोधकांनी दाखल केलेल्या अविश्वास प्रस्तावाच्या चर्चेवरील भाषणात बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदींनी संसदेत सरकारची बाजू मांडत विरोधकांना सुनावले.

तर पहिल्या दीड तासांच्या भाषणात मोदींनी मणिपूर हिंसाचाराच्या घटनांबद्दल एक शब्दही न काढल्याने विरोधकांनी सभात्याग केला. मोदींनी अविश्वास प्रस्तावावर बोलताना जवळपास दोन तासाहून अधिक काळ भाषण केले. यानंतर लोकसभा अध्यक्षांनी अविश्वास प्रस्ताव फेटाळला. तसेच सर्वात महत्वाचं म्हणजे काँग्रेसचे नेते अधीर रंजन चौधरींचे देखील निलंबन करण्यात आले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपली भूमिका मांडल्यानंतर अविश्वास प्रस्तावावर मतदान झाले. त्यामुळे या मतदानाकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागलेले होते. मात्र, विरोधकांनी पंतप्रधान मोदींचे भाषण सुरू असतानाच सभात्याग केला. यामुळे मोदींचे भाषण संपल्यानंतर सभागृहात विरोधक उपस्थित नव्हते. त्यानंतर लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी अविश्वास प्रस्तावावर मतदान घेतले. त्यात सत्ताधारी पक्षांनी अविश्वास प्रस्तावाविरोधात आवाजी मतदान केले. तर विरोधकांनी सभात्याग केल्यामुळे हा प्रस्ताव लोकसभा अध्यक्षांनी फेटाळला.

लोकसभेत मोदी सरकारची चहुबाजुंनी कोडीं केलेल्या काँग्रेसच्या अधीर रंजन चौधरी यांच्या प्रत्येक आरोपांचा पंतप्रधान नरेंद्र मोदींनी चोख हिशेब केला. ज्यांचे स्वत:चे हिशेब बिघडलेले आहेत ते आमचा हिशेब काय मागताहेत, असा बोचणारा सवाल करीत मोदींनी चौधरी यांना चांगलेच फटकारले. काँग्रेसने चौधरी यांचा सतत अपमान केल्याची जाणीव मोदींनी त्यांना करून दिली. गुळाचा गोबर करायचा हे चौधरी यांनी दाखवले, असा तिरकस टोलाही मोदींनी लगावला. मोदींच्या भाषणात काही मिनिटे चौधरीच निशाण्यावर राहिले.

नरेंद्र मोदी म्हणाले, आता यांनी त्यांच्या आघाडीचं नाव बदललं आहे. आघाडीला इंडिया आघाडी असं नाव त्यांनी दिलंय. परंतु, ही इंडिया आघाडी नसून घमंडिया आघाडी आहे. तिकडे आता प्रत्येकजण नवरदेव बनू इच्छितो. सगळ्यांनाच पंतप्रधान बनायचं आहे. त्यांनी हा साधा विचार केला नाही की कोणत्या राज्यात कुणाबरोबर तुम्ही कुठे पोहोचला आहात? कुठल्या राज्यात कोणाबरोबर आणि कोणाविरोधात बसला आहात. पश्चिम बंगालमध्ये तुम्ही तृणमूलबरोबर आणि कम्युनिस्ट पक्षाच्या विरोधात आहात. तर दिल्लीत एकत्र आहात.

## अपताघातील आकाश चंदनशिवे याचे उपचारा दरम्यान निधन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** आटपाडी शहरात दिनांक १६ जुन रोजीचे झालेल्या अपघातामधील आकाश चंदनशिवे या युवकाचा उपचारा द्रुयम्यान मृत्यू झाला असून या मृत्यूला जबाबदार असणाऱ्या चारचाकी वाहन चालकावर गुन्हा दाखल करून त्यास अटक करण्याची मागणी आरपीआयच्या वतीने करण्यात येवून पोलीस ठाणे येथे धरणे आंदोलन करण्यात आले.



**आटपाडी : पोलीस ठाणे आटपाडी येथे आकाश चंदनशिवे याच्या मृत्यूला जबाबदार असणाऱ्या चारचाकी वाहनचालकावर कारवाई करण्याची मागणी करत धरणे आंदोलन करताना आरपीआयचे पदाधिकारी व कार्यकर्ते**

याबाबत अधिक माहिती अशी, आटपाडी वीज बोर्डा जवळ येथे दिनांक १६ जुन रोजी दुचाकी व चारचाकी यांचा अपघात झाला होता. या अपघातामध्ये आकाश चंदनशिवे हा गंभीर जखमी झाला होता. त्याच्यावर भारती हॉस्पिटल सांगली येथे दीड महिना उपचार सुरू होते. परंतु त्याचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला.

आकाश चंदनशिवे याच्या मृत्यूला जबाबदार असणाऱ्या चारचाकी वाहन चालकावर जो पर्यंत कारवाई होत नाही तो पर्यंत मृत्यदेह ताब्यात घेणार नसल्याचे सांगत आरपीआयच्या वतीने पोलीस ठाणे येथे धरणे आंदोलन करण्यात आले. आटपाडी पोलीस स्टेशनचे पी.आय शरद मेमाने यांनी चारचाकी वाहन चालकाला अटक करण्याचे आश्वासन दिल्याने आंदोलन थांबविण्यात आले.

सदरचे आंदोलन हे जिल्हाध्यक्ष राजेंद्र खरात यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.

आंदोलनात, सुषमा मोटे, पुनम ऐवळे, रणजित ऐवळे, नामदेव खरात, साहिल खरात, दत्तात्रय खरात, दिपक सावंत, समाधान खरात, आकाश खरात विकास खरात, किरण माने, विवेक सावंत, संतोष सावंत, अजित गेजगे, स्वप्निल चव्हाण, यांच्यासह बोंबेवाडी गावचे ग्रामस्थ व रिपब्लिकन पक्षाचे आटपाडी तालुक्यातील सर्व पदाधिकारी कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## भाजपच्या वतीने तिरंगा रॅलीचे आयोजन

### करगणी–आटपाडी दुचाकी रॅली : गोपीचंद पडळकर, राजेंद्रआण्णा देशमुख राहणार उपस्थित

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** आटपाडी तालुका भारतीय जनता पार्टीच्या वतीने दिनांक १२ रोजी करगणी ते आटपाडी अशी भव्य दुचाकी तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले असून या तिरंगा रॅलीस आमदार गोपीचंद पडळकर, मा.आ. राजेंद्रआण्णा देशमुख यांच्या प्रमुख उपस्थित ही तिरंगा रॅली काढण्यात येणार असल्याची माहिती संयोजन जयवंत सरगर यांनी दिली.



**गोपीचंद पडळकर**



**राजेंद्रआण्णा देशमुख**

भारतीय जनता पार्टीच्यावतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विचारातून स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी दिनानिमित्त संपूर्ण देशभर विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. स्वातंत्र संग्रामातील अज्ञान नायक, क्रांतिकारक यांच्या आठवणी व देशभक्तीची भावना व स्वतंत्र लढ्याच्या स्मृती प्रत्येक नागरिकाच्या मनात कायम रुजाव्यात स्वतंत्र लढ्यातील क्रांतिकारकांचा इतिहास नव्या पिढीला समजावा या पवित्र उद्देशाने हर घर तिरंगा, मेरी मिट्ठी मेरा देश, फाळणी दिन विभाजन विभिषिका स्मृती दिवस असे कार्यक्रम आटपाडी तालुक्यात भारतीय जनता पार्टीच्या वतीने राबविण्यात येणार आहेत.

तरी दि.१२/०८/२०२३ रोजी सकाळी ९ वाजता करगणी येथून आटपाडी असे तिरंगा भव्य मोटारसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे तरी सर्व नागरिकांनी या रॅलीमध्ये मोठ्या संख्येने उस्फुर्तपणे भाग घ्यावा असे आवाहन संयोजन जयवंत सरगर यांनी केले असून या तिरंगा रॅलीस ब्रह्मानंद पडळकर मा. समाजकल्याण सभापती, हर्षवर्धन देशमुख मा. सभापती पं.स.आटपाडी, अनिल पाटील, विलास काळेबाग संयोजक सांगली जिल्हा, विष्णूपंत अर्जुन मा. मार्केट कमिटी सदस्य, उमाजी सरगर तालुका अध्यक्ष भाजपा, प्रणव गुरव युवा मोर्चा अध्यक्ष आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## "माणगंगा" च्या देवस्थान जमिनीची चौकशी : शिवाजीराव वाघ

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** माणगंगा साखर कारखान्यास तोडणी वाहतुकीसाठी नाथ देवस्थानच्या ७७ गुंठे जमिनीवर पुण्यातील खासगी कंपनीला २० कोटी रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आले आहे. चार कोटी रुपये वितरीतही करण्यात आले आहेत. त्यानंतर जिल्हा बँकेकडून त्या जमिनीची वकिलांच्या पॅनेलकडून चौकशी करण्यात येत असल्याची माहिती बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजीराव वाघ यांनी दिली.

जिल्हा बँकेने माणगंगा कारखानाच्या थकीत कर्जासाठी तो लिलावात स्वत: खरेदी केला आहे. बँकेने हा कारखाना आता माणगंगा साखर कारखान्याच्या नूतन संचालकांना लिव्ह अँण्ड लायसेन्स तत्वावर चालवण्यासाठी देण्याचा निर्णय घेतला आहे. चार गळीत हंगामासाठी हा कारखाना चालवण्यास दिला आहे. माणगंगा कारखान्याचे अध्यक्ष शिवाजी भगवान पाटील हेच अध्यक्ष असलेल्या शिवतेज कंपनीला तोडणी वाहतुकीसाठी जिल्हा बँकेचे २० कोटी रुपयांचे कर्ज मंजूर केले आहे. या कर्जासाठी पाटील यांनी ७७ गुंठे जमीन तारण दिली आहे.

ही तारण जमीन दिघंची (ता. आटपाडी) येथील गट नंबर १६११ मधील आहे. या गट नंबरची जमीन आटपाडीतील नाथ देवस्थान ट्रस्ट असल्याचा आरोप राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष हणमंत देशमुख यांनी केला होता. याबाबत जिल्हा उपनिबंधकांकडेही तक्रार करण्यात आली आहे.

देवस्थानच्या जमिनीवर ४ कोटी रुपयांची रक्कमही कारखान्याला देण्यात आली आहे. परंतु देशमुख यांच्या तक्रारीनंतर जिल्हा बँकेचे प्रशासनाने याबाबत ठोस पावले उचलली आहेत. बँकेला तारण देण्यात आलेली जमीन देवस्थानची आहे का? याबाबतची चौकशी बँकेच्या वकीलांच्या पॅनेलकडून करण्यात येत आहे.

देवस्थानची जमीन असल्याचे स्पष्ट झाल्यास कर्जप्रकरण थांबवण्यात येईल. कर्जासाठी दुसरी जमीन तारण म्हणून घेतली जाईल. त्यानंतरच उर्वरित कर्जाची रक्कम देण्यात येईल, असे वाघ यांनी सांगितले.

### आमदार अनिलभाऊ बाबर यांच्या विशेष प्रयत्नातून निधी

## खरसुंडीत विविध विकासकामांचे उद्घाटन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**खरसुंडी / मनोज कांबळे :** आमदार अनिलभाऊ बाबर व सांगली जिल्हा बँक संचालक तानाजीराव पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून खरसुंडी येथे विविध विकास कामाचे उद्घाटन सोहळा पार पडला. सरपंच धोंडीराम इंगवले, उपसरपंच राजक्का कटरे, माजी सरपंच चंद्रकांत पुजारी, माजी उपसरपंच अर्जुन सावकार, जगनाथ कोळपे, दिलीप सवणे, प्रमुख उपस्थित होते.



**खरसुंडी : येथे विविध विकासकामांचे उद्घाटन करताना आमदार अनिलभाऊ बाबर व उपस्थित.**

आमदार अनिलभाऊ बाबर यांच्या स्थानिक निधीतून महादेव मंदिर ते सिद्धनाथ मंदिर येथे बंदिस्त पेव्हिंग ब्लॉक व बंदिस्त गटार, जानकर वस्ती येथे स्मशानभूमी बांधणे, नवीन वसाहतीमध्ये बंदिस्त गटार व पेव्हिंग ब्लॉक बसवणे आदी विकासकामांचा भूमिपूजन व उद्घाटन सोहळा पार पडला.

यावेळी ग्रा.पं.सदस्य सुभाष माळी, किरण पुजारी मनीषा बनसोडे, शारदा पुजारी, जनाबाई केंगार, विक्रम भिसे, राहुल गुरव, निलेश पोमधरणे, ग्रामसेवक पवन राऊत, विजयकुमार भांगे, जितेंद्र पाटील, नितीन पुजारी, खरसुंडी वि.का सोसायटीचे चेअरमन जगदीश पुजारी, व्हा.चेअरमन आनंदा पुजारी, नानाभाऊ पुजारी, बबन सानप, नामदेव जानकर, देवबा जानकर, सुखदेव जानकर, विश्वास गुरव, विनायक सगरे, मोहन शिंदे, विनोद पुजारी, मंगेश पुजारी, रोहित भांगे, अवधूत देशपांडे, विकास पुजारी, हरिदास पुजारी, सचिन गुरव, विकी शेख, ऋषिकेश पुजारी यांच्यासह जानकरवस्ती-खरसुंडी पंचक्रोशीतील ग्रामस्थ उपस्थित होते.

## पदभरतीच्या नावावर उमेदवारांची लूट : अॅड. प्रकाश आंबेडकर

**अकोला :** पदभरतीच्या नावावर उमेदवारांकडून खासगी कंपन्यांमार्फत शुल्क वसूल करत फंड उभा केला जात आहे, असा गंभीर आरोप वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष अॅड. प्रकाश आंबेडकर यांनी केला. वसूल केलेल्या शुल्काचे वाटेकरी कोण? याचा खुलासा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी करावा, असे आव्हान देखील त्यांनी दिले. अकोल्यात पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

सध्या राज्य सरकार खासगी कंपन्यांमार्फत सुशिक्षित बेरोजगारांची पदभरतीच्या नावावर आर्थिक लूट करीत आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील जिल्हा परिषदमध्ये सरळ सेवा मेगा भरतीची जाहिरात देऊन सरकार बेरोजगार उमेदवारांकडून राखीव असल्यास ९०० तर खुल्या प्रवर्गाकडून एक हजार रुपये शुल्क वसूल करीत आहे. आयबीपीएस व टीसीएस या दोन्ही कंपन्यांवर घोटाळ्यांचे आरोप आहेत. त्यांची चौकशी सुरू आहे, नियमाप्रमाणे त्या कंपन्यांना काम देऊ नये. आगामी काळात या कंपन्यांचे संचालक कोण आहेत ते उघड करू,असा इशारा ड. प्रकाश आंबेडकर यांनी दिला.

भाऊ कन्स्ट्रक्शन

बिल्डर्स & डेव्हलपर्स

9004792356

- उत्कृष्ट,दर्जेदार आणि मजबूत पध्दतीचे कामे.
- सर्वांच्या पसंतीत आणि विश्वासात नं.१ चे स्थान असलेले.

## सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेच्या वतीने मान्यवरांचा सन्मान

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** आटपाडी तालुका सेवानिवृत्त कर्मचारी संघटना यांच्या वतीने तालुक्यातील मान्यवरांचा सत्कार समारंभ कार्यक्रम नुकताच संपन्न झाला.



**आटपाडी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी मुक्तेश्वर माडगुळकर यांचा सत्कार करताना सेवानिवृत्त संघटनेचे पदाधिकारी**

यावेळी तालुक्याचे सुपुत्र आटपाडी पंचायत समितीचे प्रभारी गटविकास अधिकारी मुक्तेश्वर माडगुळकर, पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी दत्तात्रय मोरे, विस्तार अधिकारी म्हणून बढती मिळालेले जगन्नाथ कोळपे, श्री. फोंडे, लेखा विभागमध्ये बढती मिळालेल्या श्रीमती पंचविशे, श्रीमती भाबड, दैनिक माणदेश एक्सप्रेसचे संपादक दिपक प्रक्षाळे या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला सेवानिवृत्त संघटनेचे तालुकाध्यक्ष अशोक मोटे, जिल्हा उपाध्यक्ष माणिक खंडागळे, सरचिटणीस श्री. गुरव, कार्याध्यक्ष विजय राजमाने यांच्यासह संघटनेचे सर्व पदाधिकारी व सभासद उपस्थित होते.

Email - netra7676@gmail.com

डिजीटल जम्बो नेत्रा कलर झेरॉक्स्

७/१२ उतारे, सर्व शासकीय फॉर्म, मराठी टायपिंग

धिरज, 9503 63 8686 दिपक, 9595 04 7676 गाळा नं. ११

# संपादकिय

## राजकारणी सुधारणार तर कधी?

राज्यामध्ये ज्या पक्षाचे सरकार सत्तेवर येतील त्या पक्षाचे अजेंडा रेटण्याचे काम नेहमी अग्रक्रमाने केले जाते. यामध्ये ज्यांना विकासाचे काहीच देणे-घेणे नाही अशांना पुढे करून काम रेटण्याचे उद्योग केले जातात. त्यामुळे राजकारणी सुधारणार तर कधी हा प्रश्न नेहमी पडत आहेत. कारण नुकतीच न्यायालयाने खासदार अन आमदार असलेल्या दाम्पत्याची कानउघडणी केली आहे.

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या 'मातोश्री' या खासगी निवासस्थानाबाहेरील हनुमान चालिसा पठणप्रकरणी खासदार नवनीत राणा आणि आमदार रवी राणा दाम्पत्य आदेश देऊनही गुरूवारी न्यायालयात अनुपस्थित होते. त्यामुळे न्यायव्यवस्था तुम्हाला गंमत वाटली का ? असा संतप्त प्रश्न करून विशेष न्यायालयाने राणा दाम्पत्य आणि राज्य सरकारला खडेबोल सुनावले.

संसदेचे अधिवेशन सुरू असल्यामुळे खासदार नवनीत राणा यांची अनुपस्थिती समजू शकते. मात्र, आमदार रवी राणा अनुपस्थित का? असा प्रश्न न्यायालयाने केला. तसेच, राणा दाम्पत्याच्या चालढकल वृत्तीवर विशेष न्यायाधीश राहुल रोकडे यांनी ताशेरे ओढले. न्यायालयाच्या नाराजीनंतर सरकारी वकील न्यायालयात उपस्थित झाले. त्यावेळी न्यायव्यवस्था म्हणजे गंमत वाटली का ? अशा शब्दांत न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. तसेच, पुढील सुनावणीच्या वेळी राणा दाम्पत्याने उपस्थित राहण्याचे आदेश देताना ही शेवटची संधी असल्याचे बजावले.

मातोश्रीबाहेर हनुमान चालिसा पठण करण्याचे जाहीर करून राणा दाम्पत्याने कायदा आणि सुव्यवस्था बिघडवण्याचा प्रयत्न केला. शिवाय, दोघांनी पोलिसांच्या कामात अडथळा आणल्याचा आरोपही राणा दाम्पत्यावर आहे. राणा दाम्पत्य सध्या जामिनावर बाहेर असून आवश्यक असेल तेव्हा सुनावणीसाठी उपस्थित राहण्याची अट त्यांना जामीन मंजूर करताना न्यायालयाने घातली होती. परंतु, वारंवार आदेश देऊनही राणा दाम्पत्य अनेकदा सुनावणीसाठी अनुपस्थित राहिले. त्यावेळीही, न्यायालयाने त्यांच्या या वागणुकीवर ताशेरे ओढले होते. न्यायालयाने राणा दाम्पत्याला गुरूवारीही सुनावणीसाठी उपस्थित राहण्याचे आदेश दिले होते. परंतु, गुरूवारच्या सुनावणीलाही राणा दाम्पत्य अनुपस्थित होते. त्यांचे वकील तसेच सरकारी वकील आणि तपास अधिकारीही अनुपस्थित होते. राणा यांचे वकील आजारपणामुळे अनुपस्थित असल्याचे न्यायालयाला सांगण्यात आले. परंतु, न्यायालयाने पुन्हा एकदा त्याबाबत नाराजी व्यक्त केली. त्यामुळे हे राजकारणी सुधारणार तर कधी? असा प्रश्न मात्र सर्वसामान्य नागरिकांना नेहमी पडलेला असतो, अन तो पडणार हे सत्य आहे.

## सातारचे प्रतिसरकार - भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील सुवर्ण पान

मेरी माटी, मेरा देश अभियानांतर्गत प्रतिसरकारबद्दल माहिती देणारा ॲड. सुभाष पाटील यांनी लिहिलेला लेख....

भारतीय स्वातंत्र्याचा लढा हा प्रदीर्घ चाललेला संघर्ष होता. इंग्रजी सत्तेने हळूहळू आपले पाय रोवायला सुरवात केली, तेव्हापासूनच त्याला विरोध सुरू झाला होता. परंतु तो विस्कळीत स्वरूपात होता. त्यामुळे बलाढ्य ब्रिटिश सत्तेला तो मोडून काढणे सहज शक्य होत असे. १८५७ चा उठाव ब्रिटिशांनी मोडून काढला. परंतु, ब्रिटिशांविरूध्दचा असंतोष वाढतच होता. कधी सशस्त्र, कधी हिंसक, कधी निवेदने देवून तर कधी अहिंसक अशा विविध मार्गांनी स्वातंत्र्याची मागणी होत राहिली. ब्रिटिश सत्तेला विरोध करून स्वातंत्र्याच्या मागणीला धार आली. ८ ऑगस्ट १९४२ ला राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात महात्मा गांधीजींनी ब्रिटिशांना चले जाव असे ठणकावून सांगितले आणि देशवासियांना करो या मरो असा आदेश दिला. जनक्षोभाचा अंदाज घेत त्याच रात्री ब्रिटिशांनी तत्कालीन सर्व प्रमुख पुढाऱ्यांना अटक करून तुरूंगात टाकले. परंतु, या घटनेने देशातील सर्वसामान्य जनतेने स्वातंत्र्यलढा आपल्या हाती घेतला आणि सर्वदूर याचे लोण पसरले. महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातही मोर्चापर्व सुरू झाले. जिल्ह्यातील पाटण, कराड, तासगाव, इस्लामपूर, वडूज येथील मामलेदार कचेरीवर हजारो लोकांचे मोर्चे निघाले. तासगावच्या मामलेदार कचेरीवरील मोर्चाने इतिहास घडवला. तेथील युनियन जॅक खाली उतरवून तेथे चरखाधारी तिरंगा फडकविला. मामलेदाराच्या डोक्यावरील हॅट उतरवून त्याला गांधी टोपी घातली आणि तिरंग्याला सलामी द्यायला भाग पाडले. तालुक्यातील न्यायालयातही याचीच पुनरावृत्ती केली. या मोर्चाने सातारा प्रतिसरकारची पायाभरणी केली. पुढे वडूज व इस्लामपूरच्या मोर्चावर ब्रिटिशांनी गोळीबार केला आणि ११ जणांचा प्राण घेतला. यामुळे क्रांतिकारकांनी आपले लढ्याचे तंत्र बदलले आणि ब्रिटिश सत्तेला हादरे द्यायला सुरवात केली. त्याचेच रूपांतर सातारच्या ऐतिहासिक प्रतिसरकारमध्ये झाले. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात जी काही मोजकी प्रतिसरकारे स्थापन झाली, त्यात सर्वात प्रदीर्घ काळ चालणारे आणि ब्रिटिश पोलिसांना सळो की पळो करून सोडणारे प्रतिसरकार म्हणजे सातारचे प्रतिसरकार होते. तब्बल ४६ महिने या सरकारने ब्रिटिश सत्तेला समांतर सरकार स्थापन करून कारभार चालवला. जिल्ह्यातील (तेव्हाचा सातारा जिल्हा आताचा सांगली आणि सातारा जिल्हा) सुमारे ६५० गावात आपले सरकार स्थापन करून स्वतंत्र कारभार चालवला. या प्रतिसरकारने आपली स्वतंत्र लिखित घटना तयार केली. स्वतंत्र न्यायव्यवस्था तयार केली. प्रत्येक गावांत न्यायदान कमिट्या स्थापन केल्या होत्या. त्यामध्ये गावातील लोकांमधूनच ५-७-९ जण निवडले जात. त्यांच्याद्वारे गावचा कारभार पाहिला जाई. जर या पंचांचा निर्णय मान्य नसेल तर १५-२० गावांच्या गट न्याय कमिटीपुढे अपिल करण्याची सोय होती. त्यांचाही निर्णय अमान्य असल्यास कुंडलला प्रिव्ही कौन्सिलपुढे अपिल करण्याचीही मुभा होती. मात्र या कौन्सिलचा निर्णय अंतिम असे. १९४३ ते १९४७ या काळात विटा, तासगाव, कराड, इस्लामपूर, सातारा येथील ब्रिटिश कौन्सिलचे काम जवळपास ठप्प पडले होते. कारण प्रतिसरकारच्या न्यायालयात लवकरात लवकर आणि अत्यंत कमी खर्चात न्याय मिळत होता. झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी ताबडतोब होत होती. कायदा व सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी आणि ब्रिटिश पोलिसांशी सामना करण्यासाठी सशस्त्र दलाची स्थापना केली होती. तुफान दल असे या दलाचे नाव होते. कुंडल येथील व्यायामशाळेत या सैनिकांना प्रशिक्षण दिले जात असे. त्यांची बौध्दिके घेतली जात. जवळपास पाच



हजारांवर युवक या तुफान दलात सैनिक म्हणून दाखल झाले होते. सरकार म्हणून या भागातील गुंडगिरीचा पूर्ण बंदोबस्त केला होता. फंदफितुरी करणाऱ्यावर कडक कारवाई केली जात होती. खासगी सावकारी पूर्णपणे संपविली होती. दारू, अफू, गांजा या व्यसनांवर पूर्णपणे बंदी होती. चोर, दरोडेखोर, गुंडापुंडाचा बंदोबस्त केला होता. हुंडाबंदी होती. इथला स्त्रीवर्ग, माता भगिनी सुखी समाधानी सुरक्षित झाल्या होत्या. प्रतिसरकारने अत्यंत कमी खर्चात होणाऱ्या गांधी लग्नाची पध्दत रूढ केली. मानपान नाही. हुंडा नाही. रूखवत नाही. रूसवाफुगवा नाही. फक्त नवरानवरीला खादीचे कपडे आणि दोन हार एवढ्या कमी खर्चात लग्ने होवू लागल्याने गरीब सर्वसामान्य वर्ग सुखावला होता. अत्यंत शिस्तबध्दपणे प्रतिसरकारचा कारभार चालविला जाई. यामध्ये अडथळा आणणाऱ्यास, विरोध करणाऱ्यास आणि ब्रिटिशांकडे फितुरी करणाऱ्यास कडक शासन केले जाई. गुन्हेगाराचे दोन्ही पाय एकत्र बांधून दोन्ही पायांच्या तळव्यावर काठीचे तडाखे दिले जात. या शिक्षेला पत्री लावणे असे म्हटले जाई. म्हणूनच या सरकारला पत्रीसरकार असे नाव पडले.

आदर्श ग्रामराज्याचा कारभार करताना इथल्या ब्रिटिश सत्तेशीही दोन हात करावे लागत होते. त्यांची सत्ता उखडून टाकण्यासाठी क्रांतिकारी कारवाया करत होते. ब्रिटिश ठाणी जाळणे, सरकारी खजिना लुटणे, त्यांचा शस्त्रसाठा हस्तगत करणे अशा अनेक कारवाया केल्या जात होत्या. जनतेच्या मनात विश्वासाने स्थान मिळवलेले आणि ब्रिटिश साम्राज्याने धसका घेतलेले सरकार या भूमीत उभा राहिले होते. या सरकारची दखल ब्रिटनच्या पार्लमेंटमध्ये घेतली गेली होती. सातारमध्ये राज्य कोणाचे? ब्रिटिशांचे की नाना पाटलांचे असा प्रश्न ब्रिटिश पार्लमेटला पडला होता आणि होय साताऱ्यात राज्य नाना पाटलांचे असे खालमानेने पार्लमेंटमध्ये अधिकाऱ्यांनी उत्तर दिले होते.

असे हे ब्रिटिशांना धडकी भरवणारे प्रतिसरकार क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नावाने ओळखले जात होते. कारभार सुरळीत चालण्यासाठी याचे १८ विभाग होते. प्रत्येक विभागाला एक गट प्रमुख आणि दोन उपप्रमुख होते. सर्व विभागात समन्वय साधण्यासाठी डिक्टेटर होते. ३ ऑगस्ट १९४३ च्या पणुंब्रे येथील बैठकीत प्रतिसरकारची कार्यकारिणी जाहीर झाली. सुरवातीला यशवंतराव चव्हाण प्रतिसरकारचे डिक्टेटर होते. त्यांच्या अटकेनंतर किसनवीर आबा काही काळ डिक्टेटर झाले. त्यांच्यानंतर क्रांतीवीर नाथाजी लाड हे प्रतिसरकारचे डिक्टेटर राहिले. बर्डे मास्तर, बाबुजी पाटणकर, शेख काका, नागनाथ नायकवडी, किसन अहिर, जी. डी. बापू लाड, ईश्वरा बापू लाड, भगवानराव मोरे, गोविंदराव मिरगे, रा. तु. पाटील, किसनवीर आबा, बाबुराव चरणकर, पांडु मास्तर, धोंडिराम माळी, शाहीर शंकरराव निकम, स्वामी रामानंद भारती, आप्पा मास्तर यांचे बरोबरच धुळ्याचे डॉ. उत्तमराव पाटील असे अनेक क्रांतिकारक नाना पाटलांबरोबर प्रतिसरकारात लढत होते. या क्रांतिकारकांनी जीवावर उधार होवून ब्रिटिशांविराधोत लढा दिला. यातील अनेकांवर पकड वारंट निघाले. अनेकांना पकडण्यासाठी हजारो रूपयांची बक्षिसे लावली होती. पोलिसांना बघताक्षणी गोळ्या घालण्याचे आदेश दिले. अनेकांना पकडून तुरूंगात डांबण्यात आले. या क्रांतिकारकांच्या घरच्या लोकांचा छळ करण्यात आला. घरेदारे, शेत जमिनी जप्त केल्या. पण येथील सर्वसामान्य लोकांच्या पाठिंब्याच्या जोरावर प्रतिसरकार लढत राहिले. हे प्रतिसरकार मोडून काढण्यासाठी ब्रिटिश पोलिसांनी दडपशाही, दमनशाहीचा हरप्रकारे वापर केला. क्रूरतेची परिसीमा गाठली. परंतु अखेरपर्यंत त्यांना यश मिळाले नाही. केवळ ब्रिटिशांना घालवणे एवढेच प्रतिसरकारचे उद्दिष्ट नव्हते तर आदर्श ग्रामराज्य कसे असावे याचा तो वस्तुपाठ होता. छ. शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या समन्यायी स्वराज्याची ती लहान प्रदेशात साकारलेली प्रतिकृती होती. ती सातारा जिल्ह्याची क्रांतीभूमी होती.

**ॲड. सुभाष पाटील**

(लेखक क्रांतिसिंह नाना पाटील यांचे नातू आहेत)

## जिल्ह्यात गांजा सारख्या पिकाची लागवड होऊ नये याची दक्षता घ्यावी : डॉ.राजा दयानिधी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** जिल्ह्यात यंदा खरीपाची पेरणी कमी झाली असल्याने जिल्ह्याच्या काही दुर्गम भागात गांजा सारख्या पिकाची लागवड होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी कृषी, महसूल आणि पोलीस विभागाने याबाबत अधिक दक्ष राहून जिल्ह्यातील प्रत्येक गावातील पीक पेऱ्याची माहिती घ्यावी. जिल्ह्यात गांजा सारख्या पिकाची लागवड होऊ नये याची दक्षता घ्यावी. या कामी ग्रामस्तरीय यंत्रणेची मदत घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी आज दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांच्या अध्यक्षतेखाली नार्को समन्वय केंद्र, एनकॉर्ड समितीची बैठक झाली. बैठकीस पोलीस अधीक्षक डॉ. बसवराज तेली, महापालिका आयुक्त सुनील पवार यांच्यासहा संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



डॉ. राजा दयानिधी

जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी सांगितले, जिल्ह्यात अंमली पदार्थांची विक्री होवू नये यासाठी संबधित विभागांनी नेहमी सतर्क राहून तपासणी मोहीम राबवाव्यात. यासाठी सीमावर्ती भागात आवश्यक खबरदारी घेणे गरजेचे आहे. जत, उमदी, संख या भागात पोलीस पाटील यांच्या बैठका घेऊन याबाबत त्यांना माहिती देण्यात यावी.

अन्न व औषध प्रशासन विभागाने जिल्ह्यातील किरकोळ व घाऊक औषध विक्री करणाऱ्या मेडिकलमधून अंमली पदार्थ विक्री होऊ नये यासाठी मेडिकल दुकानांची तपासणी करावी. पोलीस, आरटीओ विभागाने जिल्ह्यात अंमली पदार्थ वाहतूक होऊ नये यासाठी विशेष पथके करून तपासणी करावी. तसेच माध्यमिक शिक्षण विभागाने याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करावी. विद्यार्थ्यांना व्यसनाची सवय लागू नये यासाठी प्रसंगी त्यांच्या शाळेच्या दप्तराची शिक्षकांमार्फत तपासणी करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी दिल्या.










दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

दैनिक
माणदेशी बुलंद आवाज...
# माणदेश एक्सप्रेस




दैनिक माणदेशी बुलंद आवाज... माणदेश एक्सप्रेस


## ग्रामपंचायत निवडणूकीसाठी सुधारित मतदार यादी कार्यक्रम जाहीर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील माहे जानेवारी २०२३ ते माहे डिसेंबर २०२३ या कालावधीत मुदत संपणाऱ्या, नवनिर्मित व सन २०२२ मध्ये चुकीची प्रभागरचना झाल्यामुळे निवडणुका न होऊ शकलेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक तसेच निधन, राजीनामा, अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे ग्रामपंचायतीतील सदस्य, थेट सरपंचांच्या रिक्त झालेल्या जागांच्या पोटनिवडणुकांसाठी संगणक प्रणालीव्दारे राबविण्यात यावयाचा मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर केला होता. सद्यस्थितीत पारंपारिक पध्दतीने मतदार याद्या तयार करण्याबाबत सूचना देवून सुधारित कार्यक्रम निश्चित करून दिला आहे. अशी माहिती उपजिल्हाधिकारी राजीव शिंदे यांनी दिली.

मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक शनिवार, १ जुलै २०२३ असून प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक गुरूवार, १० ऑगस्ट २०२३, हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी गुरूवार, १० ऑगस्ट २०२३ ते सोमवार, २१ ऑगस्ट २०२३ पर्यंत आहे. प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक शुक्रवार, २५ ऑगस्ट २०२३ असा आहे.

## बोलेरो गाडी अंगावर घालून चिरडले

**माणदेश एक्सप्रेस न्युज**



**पंढरपुर :** पटवर्धन कुरोली येथे मागील भांडणाचा राग मनात धरून बोलेरो जीप अंगावर घालून चिरडून ठार मारले. ही घटना गुरुवारी (दि.१०) सकाळी घडली. देविदास दिगंबर नाईकनवरे असे या घटनेत मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तीचे नाव असून त्यांच्याच नात्यातील दोन आरोपींविरोधात करकंब पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासंदर्भात पांडुरंग नाईकनवरे ( वय ४७ वर्ष, रा. पटवर्धन कुरोली ता. पंढरपूर) यांनी करकंब पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

याबाबत अधिकची माहिती अशी की, देविदास नाईकनवरे याची भाची प्रियंका पवार हिचा विवाह सिध्देश्वर नाईकनवरे (रा. पटवर्धन कुरोली ) याच्यासोबत सात वर्षा पूर्वी झालेला होता. प्रियंका हिला रानातले काम जमत नसल्याने तिचे सासु-सासरे व पती हे तिला नेहमी शिवीगाळ करीत, वेळ प्रसंगी मारहाणही करत असत. दरम्यान, काही दिवसांपूर्वी प्रियांकाला तिचे सासु, सासरे व पती यांनी खूप मारहाण केल्याने तिला देविदास याच्या घरी आणले होते. त्यानंतर देविदास व चुलत भाऊ सचिन औदुंबर नाईकनवरे यांनी प्रियंकाच्या सासरी जावून प्रियंकाला का मारहाण केली. याचा जाब विचारत सासरा ब्रम्हदेव व प्रियांकाचा नवरा सिध्देश्वर यांचे सोबत वाद झाला होता.

देविदास नाईकनवरे हे दुचाकीवरून त्यांच्या घराकडे निघाले असताना ब्रम्हदेव नाईकनवरे यांने त्याच्या बोलेरो गाडीने पाठीमागून वेगाने येऊन देविदास यांच्या दुचाकीला धडक दिली. शिवाय, शंभर ते दोनशे फूट फरफटत नेले. गाडी पन्हा वळवून आणत देवीदासच्या अंगावर घातली. जखमी अवस्थेत देवीदास नाईकनवरे यांना चारचाकी कारगाडीमध्ये टाकून पंढरपूर येथिल खासगी रुग्णालयात दाखल करण्यासाठी आणले असता, डॉक्टरांनी मृत घोषित केले.

# आटपाडी पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांनी घेतली ‘पंचप्राण शपथ’

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** आझादी का अमृत महोत्सव समारोपीय कार्यक्रमाच्या निमित्ताने ‘पंचप्राण शपथ’ घेणेचा कार्यक्रम पंचायत समिती आटपाडी येथे काल दि०९ रोजी मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवी कार्यक्रम देशभरात मोठया उत्साहात साजरा होत आहे. भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे झालेल्या पार्श्वभुमीवर, जनतेच्या मनात या स्वातंत्र्य लढयाच्या स्मृती तेवत राहव्यात , स्वातंत्र्य संग्रामातील ज्ञात/अज्ञात नायक/क्रांतीकारक/स्वातंत्र्य संग्रामात घडलेल्या विविध घटना यांचे स्मरण व्हावे, स्वातंत्र्यासाठी चेतविलेले स्फूलिंग कायम तेवत रहावे व देशभक्तीची जाज्वल्य भावना कायमस्वरुपी जनमानसात रहावी, या देशाचे दैदिप्यमान इतिहासाचे अभिमानपुर्वक संस्मरण करण्यासाठी १५ ऑगस्ट २०२२ देशभरात पासून आझादी का अमृत महोत्सव साजरा होत आहे.

याचाच एक भाग म्हणून ‘पंचप्राण शपथ’ उपक्रम साजरा केला जातो. यामध्ये प्रत्येक भारतीय यांनी आपल्या हातामध्ये मातीचा दिवा घेवून आपल्या भारत मातेला स्मरुन शपथ घ्याची आहे की, ते भारतांस २०४७ पर्यंत आत्मनिर्भर व विकसीत राष्ट्र बनवतील, गुलामगीरीची मानसीकता मुळापासून नष्ट करतोल, देशाचा समृध्द वारशाचा गौरव करतील, भारताची एकात्मता बलशाली करुन देशाचे संरक्षण करणाऱ्याप्रती सन्मान बाळगतील, देशाचे नागरीक म्हणून सर्व कर्तव्याचे पालन करतील. याप्रमाणे पंचायत समिती आटपाडी येथे सर्व पदाधिकारी/अधिकारी व कर्मचारी यांनी ही शपथ घेतली.

यासाठी पंचायत समिती आटपाडी कडील पालक अधिकारी म्हणून जिल्हा पशूसंर्धन आधिकारा डॉ.किरण पराग. पं.स.आटपाडीचे गटविकास अधिकारी-मुक्तेश्वर माडगुळकर, सहा.ग.वि.अ सचिन भोसले, गटशिक्षणाधिकारी-दत्तात्रय मोरे, उप अभियंता-वाघमारे, ता.आ.अधि. साधना पवार, फिरोज शेख, सचिन फोंडे, संजय शिर्के, संजय पाटील, संतोष कदम, एस.एस.काळेल. स्वप्नजा पंचविशे, विद्या मंडले, सचिन पाटील, महेश गांवदरे, राजेंद्र लिंगे, हणमंत खंडागळे.संदेश भोरे सह इतर सर्व कर्मचारी उपस्थित होते.





आटपाडी : आझादी का अमृत महोत्सव समारोपीय कार्यक्रमाच्या निमित्ताने ‘पंचप्राण शपथ’पंचायत समिती येथे ‘पंचप्राण शपथ’ घेताना पंचायत समितीचे अधिकारी वर्ग

# घरनिकी येथे वसुधा वंदन अंतर्गत वृक्षारोपण

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** आझादी का अमृत महोत्सव समारोपीय कार्यक्रमांच्या संपुर्ण देशभर मेरी मिटटी मेरा देश अंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन करणेत येत आहे.

१५ ऑगस्ट २०२२ देशभरात पासून सुरु असलेल्या आझादी का अमृत महोत्सवाच्या समारोप निमित्ताने शासनाच्या वतीन मेरी माटी मेरा देश अभियांन राबविणेत येत आहे. दिनांक ०४ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट दरम्यान कार्यक्रम घेण्यात येणार असून यामध्ये गावामध्ये शिलाफलक उभारण्यात येणार असून यावर प्रधानमंत्री यांचा विजन २०४७ संदेश, स्थानिक शहीद वीरांची नांवे नमूद करण्यात येणार आहेत.

वसुधा वंदन मध्ये गावातील योग्य ठिकाणी ७५ देशी वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. स्वातंत्र्यसैनिक, वीरांचा सन्मान करण्यात येणार आहे. यामध्ये ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील ज्यांनी देशासाठी, स्वातंत्र्यासाठी व सुरक्षेसाठी बलिदान दिलेल्या तसेच निवृत्त वीरांचा सन्मान करण्यात येणार आहे.

पंचप्राण शपथ मध्ये ग्रांमपंचायत स्तरावरील सर्व अधिकारी कर्मचारी यांनी हातत दिवे लावून पंचप्राण शपथ घेणार असून, दिनांक १३ ते १५ ऑगस्ट या दरम्यान घरोघरी तिरंगा फडकाविणे इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करणेत येत आहे. दिनांक १६ ऑगस्ट रोजी प्रत्येक गावातून माती कलश गोळा करणे सदर कलश दिनांक १६ ते २० ऑगस्ट दरम्यान राज्य स्तरावरील कार्यक्रमासाठी व दिनांक २७ ते ० ऑगस्ट दरम्यान प्रधानमंत्री महोदयांच्या कार्यक्रमासाठी दिल्ली येथे घेवून जाणे इत्यादी कार्यक्रम पंचायत समिती आटपाडी मध्ये करणेत येत आहेत.

याकरीता पंचायत समिती कडील सर्व अधिकारी, कर्मचारी हे दिवसरात्र मेहनत घेत आहेत. जिल्हा पशूसंवर्धन अधिकारी डॉ. किरण पराग हे पालक अधिकारी असून श्रीमती बी.एस.माने तहसिलदार व आटपाडी पंचायत समिती आटपाडीचे गटविकास अधिकारी-मुक्तेश्वर माडगुळकर यांचे मार्गदर्शनाखाली सर्व पंचायत समिती आटपाडी कडील सर्व अधिकारी, कर्मचारी, ग्रामसेवक हे अभियान यशस्वी करणे करीता सक्रीय आहेत.



आटपाडी : वसुधा वंदन अंतर्गत वृक्षारोपण करताना गटविकास अधिकारी मुक्तेश्वर माडगुळकर, पालक अधिकारी डॉ. किरण पराग व उपस्थित मान्यवर







# बी.कॉम. पेपरफुटी प्रकरणी शहाजी कॉलेजचे चार कर्मचारी बडतर्फ

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या बी.कॉम. भाग-३ सत्र सहा अडव्हान्स अकौंटन्सी पेपर-४ (टॅक्सेशन) पेपर फुटी प्रकरणी शहाजी कॉलेजमधील चार कर्मचाऱ्यांना श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेने बडतर्फीची कारवाई करीत बडगा उगारला आहे. सेवेतून बडतर्फ केलेल्यांमध्ये अधीक्षक रवींद्र भोसले, क्लार्क सिद्धेश मिस्त्री, गणेश पाटील आणि विशाल पाडळकर यांचा समावेश आहे. शिवाजी विद्यापीठाच्या इतिहासात एका संस्थेने ऐवढी मोठी कारवाई करण्याची पहिलीच घटना आहे.

विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षेतंर्गत ३१ मे २०२३ रोजी परीक्षा सुरू होण्याअगोदर बी.कॉम. भाग-३ सत्र सहा अडव्हान्स अकौंटन्सी पेपर-४ (टॅक्सेशन) पेपर फुटल्याचा धक्कादायक प्रकार घडला होता. शिवाजी विद्यापीठाने याची तात्काळ गंभीर दखल घेत परीक्षा प्रमाद समितीमार्फत चौकशी सुरु केली. गेले दोन महिन या प्रकरणाची चौकशी सुरू होती. विद्यापीठ प्रशासनाने संबंधित कॉलेज प्रशासनाकडून अहवाल मागविला होता. सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले होते.

दरम्यान, शहाजी कॉलेज व्यवस्थापनाने साऱ्या प्रकाराची दखल घेतली. पेपर फुटी प्रकरणातील दोषींवर कारवाईसाठी जूनमध्ये संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे यांनी त्रि-सदस्यीय समिती नेमली. चौकशी समितीकडून प्रकरणाची शहानिशा, तपास सुरु झाला. दुसरीकडे विद्यापीठाच्या परीक्षा प्रमाद समितीची चौकशी सुरु होती. दोन महिने याप्रकरणी चौकशी, संबंधित कर्मचाऱ्यांचे जबाब, कायदेशीर बाबी तपासण्याची प्रक्रिया सुरु होती. संस्थेने नेमलेल्या समितीचा अहवाल जुलै महिन्याच्या अखेरीस आला. त्यानंतर विद्यापीठ परीक्षा प्रमाद समितीने संबंधित चार कर्मचाऱ्यांचे निलंबन करुन त्यांच्यावर सेवाशर्तीनुसार शिस्तभंगाची कारवाईची शिफारस ऑगस्टच्या पहिल्या आठवडयात संस्था प्रशासनास केली.

काही सिनेट सदस्यांनीही याबाबत संबंधित कारवाई करावी, अशा सूचना केल्या होत्या. त्यानंतर परीक्षा प्रमाद समितीचा अहवाल कॉलेजला प्राप्त झाल्यानंतर संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे यांनी व्यवस्थापन मंडळाशी चर्चा करुन चार कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्याच्या निर्णय घेतला. संस्था व कॉलेज व्यवस्थापनने मंगळवारी चार कर्मचाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी केली.



# माण तालुक्यात दुष्काळ जाहीर करा : बाबासाहेब माने

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**म्हसवड/प्रतिनिधी :** माण -खटाव तालुक्यात दुष्काळ जाहीर करुन जनावरांसाठी चारा छावणी व चारा डेपो करण्याची मागणी माण तालुका काँग्रेसचे अध्यक्ष बाबासाहेब माने यांनी माण तहसीलदार यांना निवेदनाद्वारे केली आहे.

महाराष्ट्रातील बहुतेक जिल्ह्यातून पावसाने हाहाकार माजवला असून सातारा जिल्ह्याच्या पश्चिम बाजूच्या घाट माथ्यावर देखील पाऊसाने थैमान घातले असून नद्या नाल्यांना आलेल्या पुरा मुळे कित्येक वाहने व जनावरे वाहून जाण्याचे प्रकार घडले आहेत. मात्र सातारा जिल्ह्याच्या पूर्वेकडील माण व खटाव तालुके पिण्याच्या पाण्यासाठी शासनाकडे टकरची मागणी करत आहेत.



दहिवडी : माण तालुक्यात दुष्काळ जाहीर करा या मागणीचे निवेदन तहसीलदार कार्यालय येथे देताना उपस्थित मान्यवर

ऑगस्ट महिना सुरु होऊन एक आठवडा संपला तरी माण खटाव मध्ये पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांचा पहिला खरीप हंगाम पूर्ण पणे वाया गेला आहे. लोकांच्या व जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झाला असून जनावरे चाऱ्या विना तडफडत आहेत.

त्यामुळे माण खटाव मध्ये त्वरित दुष्काळ जाहीर करून, चारा छावणी व चारा डेपो करण्याची मागणी करण्यात आली आहे. यावेळी सातारा जिल्हा उपाध्यक्ष एम के भोसले, माण खटाव विधानसभा अध्यक्ष डॉ. महेश गुरव, सातारा जिल्हा युवक अध्यक्ष अमरजीत कांबळे, महिला काँग्रेसच्या अध्यक्षा सौ नकुसा जाधव माण तालुका पक्ष प्रवक्ते शिवाजी यादव, टिल्लू बागवान, जिल्हा मजूर फेडरेशनचे संचालक परेश जाधव, माण तालुका उपाध्यक्ष सदाशिवराव पाटील, दाऊद मूल्ला, निलेश पोळ, विश्वासराव जाधव, प्रविण अवघडे, संदीप चव्हाण यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# बळवंत कॉलेजच्या मुलींना युरो फ्रूटस तर्फे टी-शर्ट्स व कॅप्स वाटप

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**विटा/प्रतिनिधी :** इंडोनेशियात (बाली) होणाऱ्या हॉकी स्पर्धेसाठी निवड झालेल्या मुलींना युरो फ्रूटस तर्फे टी-शर्ट्स व कॅप्स वाटप व आर्थिक मदत करण्यात आली. यावेळी युरो फ्रुट्स चे मालक नितीनअग्रवाल यांचे आभार मानण्यात आले.





विटा : बळवंत कॉलेजच्या मुलींना युरो फ्रूटस तर्फे टी-शर्ट्स व कॅप्स वाटप करण्यात आले. यावेळी युरो फ्रूटसचे नितीन अग्रवाल

इंडोनेशियात बाली येथे सिक्स ए साईड इनडोअर हॉकी स्पर्धा संपन्न होणार आहे. या स्पर्धेसाठी बळवंत कॉलेज विटा येथील कु.अश्विनी धोंडगे, कु.सिद्धी कांबळे, कु.प्राजक्ता भगत, कु.वैष्णवी पवार यांची निवड झाली आहे.

निवड झालेल्या सर्व खेळाडूंना युरो फ्रुट्स चे मालक नितीन अग्रवाल यांच्याकडून आर्थिक सहकार्य मिळाले आहे. या स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडू मुलींना युरो फ्रूटस तर्फे टी-शर्ट्स व कॅप्स देऊन हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या. या बहुमोल आर्थिक सहकार्याबद्दल सर्व खेळाडूंनी नितीन अग्रवाल यांचे मनःपूर्वक आभार मानले.

# शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी सर्वेक्षण कार्यक्रम

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** शाळाबाह्य, अनियमित व स्थलांतरीत बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात दाखल करून त्यांचे शिक्षण अबाधित राखण्यासाठी दि. १७ ते ३१ ऑगस्ट २०२३ या कालावधीमध्ये संपूर्ण जिल्ह्यात सर्वेक्षण कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे, अशी माहिती शिक्षणाधिकारी (प्राथमिक) मोहन गायकवाड यांनी दिली.

या मोहिमेत ३ ते १८ वर्षे तसेच १८ वर्षापर्यंतच्या दिव्यांग बालकांचा समावेश करण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत शाळाबाह्य अनियमित व स्थलांतरीत बालकांचा शोध घेवून त्यांना शाळेत आणणे, दि. १७ ते ३१ ऑगस्ट कालावधीत मिशन झिरो ड्रॉपआऊट उपक्रम अंमलबजावणी, शाळाबाह्य बालकांच्या नोंदी घरोघरी, बसस्थानक, रेल्वेस्थानक, सार्वजनिक ठिकाणे, झोपडपट्टी, गाव, वाड्या-वस्त्या, गावाबाहेरची पालं, शेतमळा, स्थलांतरीत कुटुंबे, विटभट्या, दगडखाणी, फुटपाथ, सिग्नल, अस्थायी निवारा करणारी कुटुंबे, बालमजूर, भटक्या जमाती, मोठी बांधकामे इत्यादी सर्व स्थळावर प्रत्यक्ष भेटी देवून करण्यात येत आहे. केंद्रप्रपुख व मुख्याध्यापक हे शहरी व ग्रामीण भागातील ६ ते १८ वयोगटासाठी पर्यवेक्षक तर प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक हे प्रगणक असतील.

तसेच अंगणवाडी पर्यवेक्षक शहरी व ग्रामीण भागातील ३ ते ६ वयोगटासाठी पर्यवेक्षक तर अंगणवाडी सेविका / मदतनीस प्रगणक असतील. महानगरपालिका क्षेत्रातील सर्व्हेक्षणाचे नियोजन प्रशासन अधिकारी महानगरपालिका सांगली हे करतील. ३ ते ६ वयोगटातील सर्व्हेक्षणाचे नियोजन जिल्हा परिषद जिल्हा महिला बालकल्याण अधिकारी हे करतील. मुलांची नोंद घेण्याकरीता अ, ब, क व ड प्रपत्रांचा वापर करण्यात येत आहे. सर्व स्तरावरील समित्यांच्या बैठका आयोजित करण्याबाबत गटविकास अधिकारी यांना कळविले आहे. सर्व लोकप्रतिनिधी, शालेय व्यवस्थापन समिती, नागरिक, पालक, स्वयंसेवी संस्था तसेच युवक मंडळे इत्यादींचा सक्रीय सहभाग घेण्यात येत असल्याचेही शिक्षणाधिकारी मोहन गायकवाड यांनी सांगितले.

# रस्ता सुरक्षेसाठीच्या उपाययोजनांना प्राधान्य द्या : डॉ.राजा दयानिधी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** रस्त्यावरील अपघातांचे प्रमाण कमी होऊन सुरक्षित रस्ते वाहतुक व्हावी यासाठी यंत्रणांनी रस्ता सुरक्षेसाठीच्या उपाय योजनांना प्राधान्य द्यावे, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ.राजा दयानिधी यांनी आज रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत दिल्या.



सांगली : येथे रस्ता सुरक्षा समितीची बैठक जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांच्या उपस्थित संपन्न झाली. बैठकीस उपस्थित अधिकारी

जिल्हाधिकारी डॉ.राजा दयानिधी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात रस्ता सुरक्षा समितीची बैठक झाली. बैठकीस पोलीस अधीक्षक डॉ.बसवराज तेली, महापालिका आयुक्त सुनील पवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मिलिंद कुलकर्णी यांच्यासह पोलीस, आरटीओ व राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी सांगितले, बरेचसे अपघात हे वाहन चालकांच्या चुकीमुळे होतात. राष्ट्रीय महामार्गावर अशा प्रकारे वाहन चालविणाऱ्यांवर पोलीस व आरटीओच्या अधिकाऱ्यांनी कडक कारवाई करावी. याबरोबरच वाहन चालकांमध्ये वाहतूक नियमबाबत जनजागृती करावी.

राष्ट्रीय महामार्गावरील ज्या ठिकाणचे दुभाजक तोडलेले आहेत ते संबधित यंत्रणांनी पुन्हा बांधून घ्यावेत. दुभाजक तोडणाऱ्या विरुध्द कारवाई करण्यासाठी पोलीस विभागाची मदत घेऊन नियमानुसार त्यांच्यावर कारवाई करावी. राष्ट्रीय महामार्गावर ब्रेक डाऊनमुळे थांबलेल्या वाहनांना रस्त्याच्या बाजूला घेण्यासाठी पुरेशी यंत्रणा ठेवावी, अशा सूचना बैठकीत दिल्या.तसेच येणाऱ्या काळात सण उत्सव सुरू होत असल्याने महापालिका प्रशासन व सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्यांवरील खड्डे भरून घ्यावेत, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी दिल्या.

# सूर्याचीवाडी येथे भीषण अपघातात चार ठार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**खटाव :** सांगली जिल्ह्यातील लोकरेवाडीला देवदर्शनासाठी भक्तांना घेऊन निघालेली मारुती ओमनी व्हॅन सूर्याचीवाडी (ता. खटाव) येथे रस्त्याकडेच्या झाडावर आदळून झालेल्या भीषण अपघातात चारजण ठार तर, सहाजण जखमी झालेत. हा अपघात गुरुवारी पहाटे सहाच्या सुमारास झाला.

अपघातात पांडुरंग सिद्धराम देशमुख (५५, रा. सिद्धेश्वर कुरोली), मालन धनाजी राऊत (५५, रा. बनपुरी, ता. खटाव) आणि सुरेखा बबन शिंदे (६०, मुळगाव राणंद सध्या रा. दहिवडी, ता. माण) यांचा जागीच मृत्यू झाला. तर, सुवर्णा संजय शिंदे (४५, रा. बनपुरी) यांचा वडूज ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी नेत असताना मृत्यू झाला.

बाळकाबाई तुकाराम देवकर (६०, रा. बनपुरी), कोमल तेजेंद्र जाधव (२८, रा. निसराळे), अमोल श्रीरंग बनसोडे (३०, रा. सिद्धेश्वर कुरोली), सुनंदा श्रीरंग बनसोडे (५०), कुंदा काशिनाथ देशमुख (५५) आणि अन्विक निलेश देशमुख (६ चौघेही रा. सिद्धेश्वर कुरोली) हे सहाजण जखमी झाले आहेत. खटाव तालुक्यातील सिद्धेश्वर कुरोली येथील पांडूरंग देशमुख यांच्या मारुती व्हॅनतून सिद्धेश्वर कुरोली, बनपुरी व दहिवडी येथील दहाजण सांगली जिल्ह्यातील



लोकरेवाडीला देवदर्शनासाठी निघाले होते. कातरखटाव ते मायणी दरम्यान, असलेल्या सूर्याचीवाडी गावाच्या हद्दीत चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने मारुती ओमनी व्हॅन (एमएच ११, बीव्ही ७२४६) ही रस्त्याकडील झाडावर जाऊन जोराने धडकल्याने हा भीषण अपघात झाला. त्यातील जखमींवर वडूज व सातारा येथे उपचार सुरु आहेत. अपघाताची नोंद वडूज पोलीस ठाण्यात झाली आहे. अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल माने हे करीत आहेत.





रणजितसिंह देशमुख यांच्या लढ्याला यश

# खटाव-माण चारा छावणीचे रखडलेले अनुदान मिळणार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**म्हसवड/प्रतिनिधी :** कायम दुष्काळी असणाऱ्या खटाव-माण तालुक्यात २०१८ साली जनावरांच्या चारा छावण्या उभारल्या होत्या. त्याचे अनुदान रखडल्याने शासनाकडे रणजीतसिंह देशमुखांनी आंदोलने करून पाठपुरावा केला होता. या लढ्याला अखेर यश आले असून माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण व माजी मंत्री महादेव जानकर यांच्या प्रयत्नातून अनुदान प्राप्त झाल्याने दोन्ही तालुक्यातून समाधान व्यक्त होत आहे.

सन २०१८ साली खरीप हंगामात दुष्काळजन्य पारिस्थिती निर्माण झाली होती. शासनाने या दरम्यान दुष्काळ जाहीर केला. सातारा जिल्ह्यातील माण , खटाव तालुक्यात जनावरांच्या चारा छावण्या उभारण्यात आल्या होत्या. खटाव माण - तालुक्यातील विविध सहकारी संस्थांनी शेतकऱ्यांची जनावरे जगली पाहिजेत या उदात्त हेतूने चारा छावण्या उभ्या केल्या. संस्थेच्या माध्यमातून लाखो रुपयाचे भाग भांडवल गुंतवले होते. दरम्यान वेळेत अनुदान न मिळून देखील चारा छावण्या व्यवस्थीतरित्या सुरु होत्या. माण, खटाव तालुक्यातील एप्रिल ते ऑगस्ट २०१९ या कालावधीतील ५ कोटी ३५ लाख २८ हजार ७२८ रुपये इतके अनुदान प्रलंबीत होते. हे अनुदान लांबणीवर पडत असल्याने चारा छावणी धारकांच्यात असंतोष



रणजीतसिंह देशमुख

निर्माण झाला होता. देशमुख यांनी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचेकडे याबाबत पाठपुरावा सुरु ठेवला होता. मात्र दुष्काळी भागाला आंदोलना शिवाय काहीही मिळत नाही याची प्रचिती यानिमित्ताने आली.

चारा छावणी धारक व शेतकऱ्यांना सोबत घेऊन देशमुखांनी विविध प्रकारे आंदोलने केली होती. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन थकीत अनुदाना बाबत लेखी पत्रही दिले होते. तर माजी मंत्री महादेव जानकर यांनी याबाबत विधान परिषदेत आवाज उठवला होता. याला विभागीय आयुक्त, पुणे यांच्या कार्यालयाकडून थकीत चारा छावणी अनुदान निधी वितरीत करण्याचे आदेश सोमवार दि. ७ ऑगस्ट रोजी जारी करण्यात आले. यामुळे खटाव माण तालुक्यातील चारा छावणी धारकांच्यातुन समाधान व्यक्त होत आहे.

थकीत चारा छावणी अनुदानासाठी उभारलेल्या लढ्याला व पाठपुराव्याला अखेर यश प्राप्त झाले. या सदर्भात माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण माजी मंत्री महादेव जानकर आणि आखील भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे सदस्य रणजीतसिंह देशमुख यांचे खटाव-माण तालुक्यातील शेतकरी व चार छावणी धारकांच्यातून अभिनंदन होत आहे.